नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# धर्मादाय संस्थांना शासनाचे सहकार्य राहील

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेसचा कोनशिला समारंभ संपन्न

पुणे : (स. गांवकरी)

लता-आशा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालय प्रकल्पात रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. या कार्यात अनेक व्यक्ती मदत करीत आहेत. शासनदेखील अशा धर्मादाय प्रकल्पांना सहकार्य करण्याचा प्रयत्न करेल. रुग्णालयाकडे येण्यासाठी पुरेशा रुंदीचा रस्ता आणि पाण्याची सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येईल. धर्मादाय संस्थांच्या इमारतींना परवानगी देताना आकारल्या जाणाऱ्या प्रीमियमवर काही प्रमाणात सूट देण्याचा विचारही करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

लता मंगेशकर मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने नांदोशी येथे उभारण्यात येणाऱ्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' या रुग्णालय प्रकल्पाच्या कोनशिला समारंभात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महापौर मंजुषा नागपुरे, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनचे अध्यक्ष



पं. हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज प्रत्येक व्यक्तीला उत्तम प्रकारची परवडणारी आरोग्य सुविधा मिळण्याची गरज आहे. धर्मादाय संस्था या क्षेत्रात कार्य करताना बऱ्याचदा असे प्रकल्प चालविण्यासाठी त्यात व्यावसायिकता दिसून येते. मात्र त्यासोबत सेवाभाव कसा असावा हे दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाने दाखवून दिले आहे. हाच अनुभव लता-आशा रुग्णालय प्रकल्पाच्या माध्यमातून मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या रुग्णालय प्रकल्पात विविध प्रकारच्या चिकित्सा पद्धती, रुग्ण पुनर्वसन केंद्र आणि कर्करोग केंद्र असल्याने रुग्णांवर चांगले उपचार होतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मंगेशकर कुटुंबाने संगीतसेवेसोबत देशाभिमान बाळगून देशसेवेचे कार्य केले असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशाच्या संकटामध्ये आपल्याकडून काय करता येईल असा विचार करून अनेकांना मदत करणारे हे कुटुंब आहे. दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांवर ट्रस्टतर्फे उपचार करण्यात आले आहेत. या रुग्णालयाने सेवेचा सौदा न करता सेवाभाव कायम ठेवून लाखो रुग्णांना आरोग्य सेवा देण्याचे कार्य केले. हेच कार्य नव्या रुग्णालय प्रकल्पाच्या माध्यमातून पुढे नेण्यात येईल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

दिवंगत आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंगेशकर कुटुंबाने जीवनभर स्वरांची सेवा केली आहे. आशाताईंनी जीवनातील कटू अनुभवांना सकारात्मकतेत परिवर्तीत केले. जीवंतपणा ठासून भरलेले त्यांचे व्यक्तीमत्व होते, त्यांनी कधीही नकारात्मकतेला जवळ येऊ दिले नाही. वयाच्या नव्वदीत तीन तासांची मैफल करणे अलौकिक असल्याचेही फडणवीस म्हणाले. पुणे आणि महाराष्ट्रासाठी आजचा दिवस भाग्याचा असल्याचे नमूद करून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक रुग्णांना नवसंजीवनी मिळते आहे. यापुढेही नव्या रुग्णालय प्रकल्पामुळे हजारो लोकांना जीवनदान लाभणार आहे आणि अनेक कुटुंबांचे दु:ख दूर होईल, तसेच रुग्णांची जीवन जगण्याची आशा पल्लवीत होईल. मंगेशकर कुटुंबाने गाण्यापलिकडे जाऊन राष्ट्रभक्तीच्या भावनेने सेवा कार्य केले आहे. त्यामुळे इथे येणाऱ्या रुग्णांना माणुसकीची ऊब मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रुग्णालयात संगीतोपचाराची सुविधा निर्माण करून त्यांना लतादिदी आणि आशा भोसले यांचा स्वर ईश्वराने दिलेले आशिर्वाद असल्याने त्यांची गीते ऐकवावीत, अशी सूचना शिंदे यांनी केली. मंगेशकर कुटुंबाच्या या सेवाकार्यास शासनाकडून सहकार्य मिळेल. लतादीदी आणि आशाताई आपल्यात नसल्या तरी त्या या रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णांसाठी सूरसंजीवनी बनून राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपले आणि पुढील पिढीचे संगीतविश्व लतादिदी आणि आशाताईंच्या स्वराशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आशाताई मराठी अस्मितेचा मानबिंदू होत्या, त्या स्वरांची आकाशगंगा होत्या. आशा नावाच्या स्वरगंगेत सर्व मानवी भावभावना सामावल्या होत्या. आशाताईंना समाजाच्या दु:ख आणि वेदनांची जाणिव होती. त्यांना जीवनात मोठा संघर्ष करावा लागला. त्यांनी जीवनाचे रडगाणे न करता आनंदगाणे केले.

सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, आपलेपणा असला तर सेवा आपोआप घडते. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांनी अखंड स्वरसेवा केली. म्हणून त्यांचे स्वर मानवी वेदना दूर करणारे आहेत. लता-आशा रुग्णालय प्रकल्पाची सुरूवात दोन्ही गायिकांच्या कार्याला दिलेली श्रद्धांजली आहे. माणसासाठी जीवनावश्यक बाबीत शिक्षण आणि आरोग्य महत्वाचे आहे. या दोन्ही गोष्टी सर्वांना परवडणाऱ्या आणि सुलभ असण्याची गरज आहे. सर्व प्रकारची चिकित्सा एकाच ठिकाणी उपलब्ध झाली तर रुग्णावर होणारा खर्च कमी होतो. मंगेशकर कुटुंबीयांच्या सेवेच्या दृष्टीकोनानुसार ही योजना नव्या रुग्णालय प्रकल्पात करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### मुंबई इंडियन्सचा सलग चौथा पराभव

मुंबई (स. गांवकरी) : पंजाब किंग्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मधील अपराजित मालिका कायम राखली. गुरुवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर श्रेयस अय्यरच्या संघाने यजमान मुंबई इंडियन्सचा दारूण पराभव केला. मुंबईचा हा सलग चौथा पराभव ठरला आणि ते आयपीएल २०२६ गुणतालिकेमध्ये नवव्या क्रमांकावर राहिले. पंजाब किंग्जने या विजयासह ९ गुणांसह अव्वल स्थानावर झेप घेताना आरसीबी व राजस्थान रॉयल्स यांना मागे ढकलेले. मुंबईच्या गचाळ क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजीमुळे क्विंटन डी कॉकचे वादळी शतक व्यर्थ गेले. २ बाद १२ धावांवरून मुंबईला २०० पार जाण्याचे स्वप्न क्विंटन डी कॉक आणि नमन धीर यांनी दाखवले. अर्शदीप सिंगने दोन चेंडूंवर दोन विकेट्स घेऊन पंजाबला चांगली सुरुवात करून दिली. पण, त्यानंतर नमन व क्विंटन यांनी ६८ चेंडूंत १२२ धावा जोडल्या. नमन ३१ चेंडूंत ३ चौकार व ३ षटकारांसह ५० धावांवर बाद झाला. क्विंटन ६० चेंडूंत ८ चौकार व ७ षटकारांसह ११२ धावांवर नाबाद राहिला.अर्शदीप सिंहचे चार षटकांमध्ये २२ धावा देत तीन बळी घेतले. या सामन्यात त्याने चमकदार कामगिरी करत आयपीएलमध्ये १५० बळी घेण्याचा विक्रम केला आहे.

### क्रेडिट घ्या, पण पाठिंबा द्या : मोदी

नवी दिल्ली (स. गांवकरी) : महिला आरक्षण विधेयकाला राजकीय तराजूत मापू नका. अर्ध्या लोकसंख्येला आपण रोखू शकत नाही. मला याचे राजकीय श्रेय घ्यायचे नाही. त्यामुळे सर्वांनी मिळून हे विधेयक पारित करावे. तुम्हाला हवे तर क्रेडिट तुम्हीच घ्या आणि हे विधेयक मंजूर करा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत म्हणताना विरोधकांना ऑफरही दिली. महिलांचे आरक्षण मतदारसंघांच्या फेररचनेशी जोडणाऱ्या नारीशक्ती वंदन घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्यासाठी तीन दिवसीय विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात विधेयकावर सखोल चर्चा केली जात आहे. विरोधकांनी या विधेयकावर काही आक्षेप नोंदवले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी लोकसभेत या विधेयकाची भूमिका, विधेयकात काय तरतूद असेल? तसेच या विधेयकामुळे नेमके काय होणार? याबाबत सविस्तर माहिती दिली. या विधेयकाला विरोधकांनी विरोध करू नये, असे आवाहनही त्यांनी विरोधकांना केले.

### वाद सोडवायला गेला आणि जीव गेला

चंद्रपूर (स. गांवकरी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्साह जयंतीचा शिगेला पोहोचलेला असताना गांधी चौकात घडलेल्या धक्कादायक घटनेने शहर हादरले. डीजेवर नाचताना झालेल्या धक्काबुक्कीतून वाद चिघळल्याने मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या इसमाची पाच युवकांनी मिळून चाकूने भोसकून हत्या केली. या हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला आहे. रविकांत उर्फ रिक्की टेभूरकर ( वय ४०) असे मृताचे नाव असून अनिकेत ताराचंद गलबले (वय २१) हा जखमी झाला आहे. रेहान अशफाक पठाण, बादल भैसारे, चेतन सोनवणे, सुहान पठाण व शेख जीशान, सर्व रा. चंद्रपूर, अशी आरोपींची नावे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मंगळवारी शहरातील विविध विहारांतून सायंकाळपासून भव्य रॅली काढण्यात आली होती. हजारो अनुयायी या रॅलीत सहभागी झाले होते. रात्री साडेअकराच्या सुमारास इंदिरा नगर येथील भीमरत्न बहुउद्देशीय युवा संस्थेची रॅली गांधी चौकात पोहोचली. यावेळी डीजेच्या तालावर नाचताना युवकांमध्ये धक्काबुक्की झाली.

## कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करा



मुंबई : (स. गांवकरी)

महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा आढावा ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी घेऊन कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या सभागृहात बैठक झाली. या बैठकीस महानिर्मिती, महापारेषण व महावितरणचे संबंधित अधिकारी आणि भारतीय मजदूर संघ प्रणित कंत्राटी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत कंत्राटी कामगारांचे वेतन, सेवा अटी, सुरक्षितता, विमा संरक्षण या विषयी चर्चा करण्यात आली. कामगारांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. कंत्राटी कामगारांच्या समस्या संवेदनशीलतेने हाताळण्याबाबत सूचना देत राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी दर तीन महिन्यांनी नियमित बैठक घेण्याचे निर्देशही दिले.

## शाहरुखच्या पत्नीचे आरोप फेटाळत स्पष्टीकरण; 'धर्मांतराचा मुद्दा खोटा'



नाशिक : (स. गांवकरी)

देशभर चर्चेत राहिलेल्या नाशिक TCS कांडात आता आणखी एक बाजू समोर आलीय. या प्रकरणातला संशयित आरोपी शाहरुखची पत्नी पहिल्यांदाच माध्यमांसमोर आली. तिने सर्व आरोप फेटाळले. धर्मांतरासारखा कोणताही प्रकार घडला नसल्याचा दावा केला. सोबतच शाहरुख सहकाऱ्यांशी फक्त थट्टा-मस्करी करायचा. त्याला केलेली अटक, पुरावे या साऱ्यांवरच तिने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकरणाचा सध्या तपास सुरू असून, एचआर मॅनेजर निदा खान अद्यापही फरार असल्याचे समजते. नाशिकमधील TCS BPO कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण झाले. धर्मांतरासाठी दबाव टाकल्याच्या गंभीर तक्रारी पोलिसांकडे आल्या. या प्रकरणी नाशिक पोलिसांनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) च्या 7 अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्यात. 26 मार्च ते 3 एप्रिलदरम्यान 9 महिलांनी एफआयआर (FIR) दाखल केले. त्यांनी कंपनीच्या मुस्लिम टीम लीडर्स आणि एचआर (HR) मॅनेजरवर लैंगिक छळवणुकीसह जबरदस्तीने धर्म परिवर्तन करण्यासारखे गंभीर आरोप केलेत. त्यामुळे थेट दिल्लीपर्यंत या प्रकरणाचे पडसाद उमटलेत. संशयित आरोपी शाहरुखच्या पत्नीने 'आजतक'शी बोलताना सर्व आरोप फेटाळलेत. शाहरुखच्या पत्नी म्हणाली की, "सर्वात आधी एफआयआरमध्ये नक्की काय लिहिले आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. एफआयआरमध्ये जे म्हटले आहे, त्यात कुठेही धर्मांतर किंवा कोणतेही रॅकेट चालवल्याचा आरोप नाही. त्यात फक्त इतकेच म्हटले आहे की, ते थट्टा-मस्करी करायचे किंवा गप्पा मारायचे." हे प्रकरण धर्मांतर रॅकेट म्हणून ज्या प्रकारे मांडले जात आहे, ते चुकीचे आणि खोटे असल्याचे तिने सांगितले. शाहरुखने महिला कर्मचाऱ्यांच्या पेहरावावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या प्रश्नावर ती म्हणाली की, "कॉर्पोरेट क्षेत्रात जर कोणी कोणाच्या कपड्यांवर काही बोलले, तर ते सहसा कौतुक (कॉम्प्लिमेंट) असते.

### 'इतक्या वर्षात एकही तक्रार नाही'

शाहरुखच्या पत्नीने त्याच्या कामाच्या रेकॉर्डचाही उल्लेख केला. ती म्हणाली की, तो अनेक वर्षांपासून तिथे काम करत आहे. जर असा काही प्रकार असता तर आधीच तक्रारी आल्या असत्या. पण आजवर त्याच्याविरुद्ध एकही तक्रार आलेली नाही. नुकतीच त्याने कंपनीची एक मोठी परीक्षा उत्तीर्ण केली होती आणि त्याला प्रमोशन देखील मिळाले होते.

## आदित्य ठाकरेंनी हिरोईनला मारले : दुबेंचा आरोप

### लोकसभेत निशिकांत; अरविंत सावंतांनी काढले गोध्रा प्रकरण, म्हणाले - 'तडीपारा'चे नाव घेऊ का?

मुंबई : (स. गांवकरी)

संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण विधेयकावर (नारी शक्ती वंदन विधेयक) चर्चा सुरू असताना आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वैयक्तिक आरोपांची मोठी चकमक उडाली. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी थेट आदित्य ठाकरे यांचे नाव घेत गंभीर आरोप केल्याने शिवसेना (ठाकरे गट) खासदार अरविंद सावंत आणि राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे प्रचंड संतापले. "मी तोंड उघडले तर गोध्रा आणि तडीपारीचे किस्सेही बाहेर येतील," अशा शब्दांत सावंतांनी भाजपला आरसा दाखवला. केंद्र सरकार नारी शक्ती वंदन विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. हे विधेयक पारित करण्यासाठी संसदेचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन देखील बोलावण्यात आले आहे. विशेष अधिवेशनाच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विधेयकामागील सरकारची भूमिका स्पष्ट केली. "हे विधेयक महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आणि आम्हाला याचे कोणतेही श्रेय घ्यायचे नाही," असे मोदींनी यावेळी नमूद



केले. मात्र, त्यानंतर सुरू झालेल्या चर्चेत राजकीय आरोपांच्या फैरी झाडल्या गेल्या.

विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना अरविंद सावंत यांनी भाजपला महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून धारेवर धरले. ते म्हणाले, "महाराष्ट्रात महिलांवर अत्याचार होत आहे. आमच्या महाराष्ट्राला कलंकीत केले जात आहे. हे बिल आणले तेव्हा मनात एकच गोष्ट येतो की, हे विधेयक आताच का मंजूर करायचे आहे? जून-जुलै महिन्यात मंजूर केले जाऊ शकत नव्हते? निवडणुकीच्या वेळी का? कारण तुम्हाला माहिती होतं की, निवडणुकीच्या काळात अनेक विरोधी पक्षाचे खासदार हजर राहू शकणार नाहीत. गैरहजर राहिले तर आपल्याला बिल पास करायला सोपे होईल", असा टोला अरविंद सावंत यांनी लगावला. अरविंद सावंत यांनी पुढे बोलताना, कुलदीप सेंगर कोणत्या पक्षाचे आहेत ते विसरु नका. बृजभूषण सिंह महिला सन्मान करणारे आहेत का?", असा सवाल केला. यानंतर भाजपचे खासदार निशिकांत दुबे विरोध करु लागले. त्यावर अरविंद सावंत यांनी सवाल केले की, "तुम्हाला बलात्कारी जास्त प्रिय आहेत का? त्याचे नाव येऊ द्या रेकॉर्डवर."

अरविंद सावंतांच्या टीकेला उत्तर देताना भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी थेट आदित्य ठाकरेंचे नाव घेतले. "जर सेंगर आणि ब्रिजभूषण यांचा दाखला दिला जाणार असेल, तर आम्हाला आदित्य ठाकरेंबद्दलही बोलावे लागेल. कारण, आदित्यनेही हिरोईनला मारले, आम्ही त्याची चर्चा करू इच्छितो" असे निशिकांत दुबे म्हणाले. या विधानामुळे सभागृहात एकच गदारोळ झाला. खासदार सुप्रिया सुळे यांनी तात्काळ आक्षेप घेत, "जे या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यांचे नाव घेणे चुकीचे आहे. निशिकांत दुबेंवर कारवाई व्हायला पाहिजे," अशी मागणी केली.

## रणरणत्या उन्हात महिलांची आक्रमक बाईक रॅली

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या महिला अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणाच्या निषेधार्थ शहरातील वातावरण तापलेले असतानाच आज हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेत मोठी बाईक रॅली काढली. या रॅलीत शेकडो महिला, तरुणी आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून नाशिकमध्ये तापमान 38 ते 39 अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले असतानाही आंदोलकांनी उन्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आपला संताप व्यक्त केला. ही रॅली ज्या कंपनीत हा गंभीर प्रकार घडल्याचा आरोप आहे, त्या ठिकाणाहून सुरू झाली. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ती जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचली. रॅलीदरम्यान आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत संबंधित प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवला. धर्मांतराच्या कथित षडयंत्राविरोधात कठोर कारवाईची मागणी यावेळी सातत्याने करण्यात आली. या आंदोलनात महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. अनेक तरुणी आणि महिला



दुचाकीवरून सहभागी झाल्या होत्या, त्यामुळे या रॅलीला रणरागिणींची बाईक रॅली, असे स्वरूप प्राप्त झाले. भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनीही या रॅलीत सहभाग घेत आंदोलकांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवला. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. आंदोलकांची प्रमुख मागणी म्हणजे पीडित महिलांना तात्काळ न्याय मिळावा आणि अटक करण्यात आलेल्या आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी होती. या प्रकरणामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, नागरिकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले. विविध हिंदुत्ववादी संघटना या मुद्द्यावर एकत्र आल्याने आंदोलन अधिक तीव्र झाले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### अक्षय्य तृतीयेनिमित्त सॅमसंगकडून आकर्षक ऑफर्स जाहीर

पुणे (स. गांवकरी) : Samsung ने अक्षय्य तृतीयेनिमित्त विशेष उत्सवी विक्रीची घोषणा करत आपल्या बीस्पोक एआय घरगुती उपकरणांवर आकर्षक सवलती जाहीर केल्या आहेत. या अंतर्गत रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, एअर कंडिशनर आणि मायक्रोवेव्हसारख्या उत्पादनांवर सुमारे २० हजार रुपयांपर्यंत कॅशबॅक तसेच विविध लाभ देण्यात येत आहेत. या ऑफरअंतर्गत ग्राहकांना एअर कंडिशनरवर ५ वर्षांची सर्वसमावेशक हमी आणि विस्तारित हमी सुविधा मिळणार आहे. यामुळे उत्पादनांच्या देखभालीचा खर्च कमी होऊन ग्राहकांना अधिक सुरक्षित आणि निश्चिंत वापराचा अनुभव मिळणार आहे. ही विशेष ऑफर ३१ मे २०२६ पर्यंत ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स तसेच देशभरातील निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध राहणार आहे. सॅमसंगची बीस्पोक एआय उपकरणे आधुनिक आणि स्मार्ट जीवनशैली लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने ही उपकरणे वापरकर्त्यांच्या सवयी ओळखून कार्यक्षमता वाढवतात. फ्रिजमधील अन्न व्यवस्थापन, कपड्यांच्या प्रकारानुसार धुण्याची प्रक्रिया, तसेच घरातील उपकरणांची देखरेख अशा अनेक सुविधा यात उपलब्ध आहेत. या उपक्रमाद्वारे ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानासह ऊर्जा बचत आणि सोयीस्कर वापराचा अनुभव देण्याचा कंपनीचा उद्देश असून, उत्सवाच्या काळात खरेदीसाठी हे एक आकर्षक पर्याय ठरत आहे.



### भीम फेस्टिवल २०२६ : बावधनमध्ये उत्साहात साजरी आंबेडकर जयंती

पुणे (स. गांवकरी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विकास प्रतिष्ठान, बावधन व सुजाता महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भीम फेस्टिवल २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या सोहळ्यात महामानव, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला पुण्यनगरीच्या प्रथम नागरिक महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी उपस्थिती लावून जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचा सत्कार बावधन गावचे माजी सरपंच कु वैशालीताई कांबळे, उमेश कांबळे, सुषमाताई कांबळे तसेच युवा उद्योजक निखिल बांदल यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला बावधन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते व त्यांचे सहकारी उपस्थित होते. तसेच अशोक डोंगरे, पश्चिम महाराष्ट्र मंडप असोसिएशनचे अध्यक्ष विजय दगडे पाटील, युवा नेते राहुल दगडे पाटील यांच्यासह बावधन परिसरातील हजारो भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्व उपस्थित मान्यवरांचे विकास प्रतिष्ठानच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या भव्य सोहळ्याचे आयोजन यशराज उमेश कांबळे यांनी केले होते.

### अनधिकृत नळ जोडण्यावर तात्काळ तोडा - स्नेहा पाटील, नगरसेविका



ठाणे (स. गांवकरी) : दिवा गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील अनधिकृत व अवैद्य चोरीचे नळ जोडण्या तात्काळ खंडित करून पाणी माफियांवर तातडीने कारवाई करावी तसेच दिवा पश्चिम परिसरात पाणी पुरवठा तात्काळ सुरळीत करण्याचा दृष्टीने कार्यवाही करण्याची मागणी प्रभाग २७ च्या नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्तांकडे करण्यात आली आहे. दिवा गावाला विशिष्ट पाणी पुरवठा करणारी १२ इंच व्यासाची जलवाहिनीवर दिवा पुर्व बाजुला रेल्वे लाईनला समांतर , रेशनिंग दुकान ते रेल्वे कलवर्ट परिसरात गेला अनेक महिन्यांपासुन अनधिकृत व चोरीचे नळ जोडणी काही पाणी माफीयांनी केली आहे. त्यामुळे दिवा गावातील बहुतांश भागात गेल्या अनेक महिन्यापासुन अनियमित पाणी पुरवठा व काही भागात थोडाही पाणी पुरवठा होत नाही. तसेच दिवा पश्चिमेतील बहुतांश परिसरात अनियमित व कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे, दिवा गावाला नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्याचा दृष्टीने पाणी पुरवठा विभागा मार्फत रेल्वे लाईनला समांतर जलवाहिनीवरील नळ जोडणी तोडुन या पाणी माफीयांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यासाठी व दिवा पश्चिमकडील इतर परिसराला पाणी पुरवठा सुरळीत करण्याचा दृष्टीने कार्यवाही व उपाय योजना करण्यासाठी दिवा प्रभाग समितीच्या प्रभाग क्र २७ च्या नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा प्रभाग समिती सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

### लोखंडी गजाने जीवघेणा हल्ला करून दागिने-रोख रक्कम लुटली

आळेफाटा (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील बेल्हे-आळकुटी रोडवरील रानमळा परिसरात गुरुवारी (दि. १६ एप्रिल २०२६ ) पहाटे अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत एका ८५ वर्षीय वृद्ध महिलेवर लोखंडी गजाने जीवघेणा हल्ला केला. या भीषण हल्ल्यात वृद्धा गंभीर जखमी झाली असून, चोरट्यांनी तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने व घरातील रोख रक्कम लंपास केली. या संतापजनक घटनेने संपूर्ण जुन्नर तालुका हादरला आहे. जिजाबाई गबाजी गुंजाळ (वय ८५ ) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या वृद्धेचे नाव आहे. त्या बेल्हे-आळकुटी रोडवरील रानमळा येथे घरात एकट्याच राहतात. बुधवारी मध्यरात्रीनंतर ते गुरुवारी पहाटे ३ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरटे परिसरात आले. त्यांनी अगोदर तीन ठिकाणी चोरीचा प्रयत्न केला, मात्र तो अयशस्वी झाला.

# 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' संपन्न

## भाजपा कार्यकर्त्यांनी जनतेला उद्योजक बनविण्याच्या सरकारच्या योजनांची माहिती द्यावी : पेसकर




संगमनेर : (स. गांवकरी)

भाजपा कार्यकर्त्यांनी जनतेला उद्योजक बनविण्याच्या सरकारच्या योजनांची माहिती द्यावी व स्वतः पण रोजगार निर्मिती करावी तरच हे प्रशिक्षण वर्ग सफल होतील असा विश्वास भाजपा प्रशिक्षण वर्गाचे प्रदेश सह संयोजक प्रदिप पेसकर यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टी संगमनेर विधानसभा मधील मंडलांच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' ते समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव गुंजाळ होते. प्रसंगी शहराध्यक्ष सौ. पायल ताजणे, पश्चिम मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत गोमासे, पूर्व मंडळाचे अध्यक्ष गुलाबराजे भोसले आदी उपस्थित होते. प्रदीपजी पेसकर यांनी अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी पक्षनिष्ठा, संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन करत प्रत्येक कार्यकर्त्याने समाजाशी सतत संपर्क ठेवून पक्ष विचार घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. त्यांच्या ओजस्वी विचारांनी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि आगामी कार्यासाठी सज्जतेची भावना निर्माण झाली. कार्यकर्त्यांना वैचारिक दिशा, संघटनात्मक कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत नवचैतन्य निर्माण केले.

उद्‌घाटन सत्रात पक्षाचा विस्तार' या सत्रात सितारामजी भांगरे यांनी संघटन मजबूत करण्यासाठी बूथ स्तरावर काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा आणि कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यानंतर रोहितजी चौधरी यांनी 'वैचारिक अधिष्ठान' या विषयावर भाष्य करत तत्त्वनिष्ठ राजकारणाची जाणीव करून दिली. डॉ. महेंद्र कोल्हे यांनी 'आपली कार्यपद्धती' या विषयावर मार्गदर्शन केले, तर काशिनाथ पावसे यांनी 'आपल्या सरकारची कामगिरी' सविस्तर मांडली. आधुनिक युगात सोशल मीडियाचे महत्त्व लक्षात घेऊन साहेबराव वलवे व भाऊसाहेब वाकचौरे यांनी 'सोशल मीडिया, नमो अँप व आयटी सेल' सरल अँप या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. तसेच योगराज परदेशी यांनी 'एस. आय.आर व मतदार नोंदणी' या विषयावर माहिती देत निवडणूक प्रक्रियेत कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट केली. सुधाकर गुंजाळ यांनी 'बुथ व्यवस्थापन व मन की बात' या विषयावर मार्गदर्शन करत प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ पातळीवर सक्रिय राहण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षण महाअभियानात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने व सक्रिय सहभागातून प्रत्येक सत्राचा लाभ घेतला. संगमनेर शहरातील कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रम, पदाधिकाऱ्यांचे नेतृत्व आणि सर्वांची एकजूट यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या शिबिरामुळे कार्यकर्त्यांना वैचारिक स्पष्टता, संघटनात्मक कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची दिशा मिळाली असून, आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## शिक्षण, समता आणि संघर्ष बाबासाहेबांचा जीवनमंत्र - पांडुरंग पवार

निमगाव सावा (ता. जुन्नर) : (स. गांवकरी)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा येथे उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक मा. श्री पांडुरंग पवार यांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री संदिपान पवार प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना संस्थापक मा. श्री पांडुरंग पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, विचार व कार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व देत "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा मूलमंत्र दिला. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय संविधानाच्या निर्मितीतून त्यांनी सर्व समाजघटकांना समान हक्क मिळवून दिले. तसेच त्यांनी अस्पृश्यता, अन्याय आणि विषमता याविरुद्ध लढा देत समाजाला प्रगतिचा मार्ग दाखवला. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## बोपोडीत भीमगीतांनी रंगली सांस्कृतिक मैफल

### प्रसिद्ध शाहीर व खंजिरी वादक मीरा उमप यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने प्रेक्षकांना केले मंत्रमुग्ध

पुणे : (स. गांवकरी)



छ. शिवाजी महाराज उद्यान, बोपोडी येथे आयोजित 'संयुक्त जयंती महोत्सव 2026' अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) छ. शिवाजी नगर मतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रसिद्ध शाहीर व खंजिरी वादक मीरा उमप यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या भारूड व भीमगीतांनी संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सुरुवात 'भीमाला पहिले वंदन' या गीताने झाली. याप्रसंगी आयोजक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष , पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, अविनाश कदम आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी 'जगाला सांग बाप माझा भीमराव रामजी आंबेडकर', 'खातो तुपात पोळी भीमा तुझ्यामुळे', 'गावामध्ये गावं महू गाव', 'उद्धारली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे', 'VIP राहण', 'जिजाऊ सावित्री रमाई तुमच्या मध्ये दिसावी', 'दारामध्ये उभी राहून माझी रमाई रडायची', 'तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे' आणि 'मी असा भीम राणा सरकार पाहिला' अशी एकापेक्षा एक गाजलेली भीमगीते सादर करण्यात आली.

तसेच धम्मचारी वरभद्र यांनी 'चार्ली चॅप्लिन' च्या वेशभुषेत 'बाबासाहेबांच्या जीवनातील प्रसंग' या सादरीकरणांनी प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सांस्कृतिक सोहळ्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर अधिक दृढ झाला असून, भीमगीतांच्या माध्यमातून सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महोत्सवात शुक्रवारी राहुल साठे यांचा भीमगीतांचा, तर शनिवारी लोककला दर्शन हा कार्यक्रम होणार आहे.

## जांभूळवाडी तलावावर भीम गीतांचा गजर; परिसर दणाणला




पुणे : (स. गांवकरी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विश्वरत्न फाउंडेशनच्या वतीने जांभूळवाडी तलाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १२ एप्रिल रोजी भीम गीतांच्या कार्यक्रमाने उत्सवाची दमदार सुरुवात झाली असून, परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १४ एप्रिल रोजी सकाळी सामूहिक वंदना उत्साहात पार पडली. यामध्ये लहान मुलं व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या विचारांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी मधुकर जाधव यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले, तर संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांनी उपस्थितांना प्रेरणादायी विचार देत उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात नरेंद्र भाऊ पारखे यांचे विशेष योगदान राहिले असून, त्यांच्या कार्याचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला व लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. संध्याकाळी साडेपाच वाजता काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण परिसर दणाणून गेला. आकर्षक रथ, दमदार साऊंड सिस्टिम आणि जयभीमच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उत्सव संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. अध्यक्ष मधुकर लोखंडे, कार्यकारी अध्यक्ष सुभाष खडसे आणि उत्सव प्रमुख प्रभाकर शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच मिलिंद लोखंडे, नितीन ओव्हाळ, प्रकाश साळवी, निलेश जाधव, सुनील कांबळे, विलास जाधव आणि रवी जाधव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

## पोदार करिकुलम सेंटर यंदा दहावीचा १००% निकाल

आळेफाटा : (स. गांवकरी)


पोदार करिकुलम सेंटर अंतर्गत कार्यरत Radiance International School, आळेफाटा येथील इयत्ता दहावी (CBSE) परीक्षेचा निकाल १००% लागला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळेने उत्कृष्ट यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे यंदाही शाळेने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या परीक्षेत क्षितिजा मंगेश कवडे हिने ९६. ०४% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कनक सचिन डावखर आणि सिद्धेश किरण मुंगसे यांनी प्रत्येकी ९५. ०४% गुण मिळवत संयुक्त द्वितीय क्रमांक मिळवला. सौरभ संतोष घोलप (९४. ०४%) याने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच वैष्णवी दत्तात्रय गुंजाळ (९२. ०४%) आणि आरुष विशाल डेरे (९०. ०२%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा गौरव वाढवला. या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या शिस्तबद्ध वातावरण आणि गुणवत्तापूर्ण



शिक्षण पद्धतीमुळे उत्तम कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षकवर्ग तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.शाळेच्या व्यवस्थापनाने सांगितले की, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. यश हे कठोर परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यांचे फलित आहे." या यशामुळे परिसरात शाळेचे नाव उंचावले असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# वाहतूक पोलिसांना ३,००० हून अधिक बाटल्यांचे वाटप

पुणे : (स. गांवकरी)




आयन सप्लाय ड्रिंकसाठी जागतिक स्तरावर नावाजलेल्या 'पोकारी स्वेट' या कंपनीने पुण्यात 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' या मोहिमेचा शुभारंभ केला आहे. ही मोहीम पुणे कॅम्पमधील साधू वासवानी रोडवरील 'डीसीपी ट्रॅफिक ऑफिस, पुणे - २' येथे पाणी आणि क्षार पुरवठा मोहिमच्या (हायड्रेशन ड्राईव्ह) माध्यमातून राबवण्यात येणार आहे. या उपक्रमात ४० हून अधिक वाहतूक पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. शहराला गतीमान ठेवण्यासाठी सध्याच्या कडक उन्हातही न थकता काम करणाऱ्या या पोलिसांच्या कष्टाची दखल घेणे आणि त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी टिकवण्यासाठी त्यांना सहकार्य करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. पुणे शहर हे आता कडक उन्हाळा आणि दुचाकींचे शहर म्हणून ओळखले जाते. यामुळे उष्णतेचा त्रास आणि निर्जलीकरणासारखी आव्हाने पुण्यात प्रकर्षाने जाणवतात. अनेक पुणेकर थेट उन्हात प्रवास करतात आणि वाहतूक पोलीस कर्मचारी अशा अतिशय विषम हवामानातही वाहनांच्या गर्दीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी चोख पार पाडत असतात. त्यामुळे या मोहिमेची सुरुवात करण्यासाठी पुणे हे एका अर्थाने योग्य शहर ठरले आहे.

'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' या मोहिमेच्या माध्यमातून 'पोकारी स्वेट'चे उद्दिष्ट हे विशेषतः कोरड्या तसेच उष्ण परिस्थितीत निर्जलीकरणासारख्या दुर्लक्षित राहणाऱ्या जोखमींबद्दल जागरूकता निर्माण करणे, हे आहे. विशेषतः उन्हात काम करणाऱ्या व्यावसायिकांना दीर्घकाळ उष्णतेचा आणि शारीरिक श्रमाचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्यासाठी शरीरातील पाण्याची पातळी टिकवणे ही केवळ एक निवड नसून ती एक दैनंदिन गरज आहे, हा महत्वाचा संदेश हा उपक्रम या मोहिमेतून अधोरेखित करण्यात येत आहे. वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या या कठीण आणि अतिशय आव्हानात्मक सेवेदरम्यान शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यास मदत करण्यासाठी पोकारी स्वेटतर्फे या मोहिमेदरम्यान ३,००० पेक्षा अधिक बाटल्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम नागरी कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. परंतु त्याचबरोबर या कर्मचाऱ्यांची चिकाटी, बांधिलकी आणि सार्वजनिक सुरक्षा तसेच शहराचे कामकाज सुरळीत ठेवण्याप्रती ते बजावत असलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा सन्मानही या मोहिमेतून करण्यात आला आहे.

पोकारी स्वेटच्या प्रवक्ते या मोहिमेबद्दल अधिक माहिती देताना म्हणाले की, 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' या मोहिमेच्या माध्यमातून आम्हाला केवळ संदेश देणे एवढेच उद्दीष्ट नसून प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन खराखुरा प्रभाव निर्माण करणे, हा आहे. वाढते तापमान आणि उन्हाचा अधिक संपर्क यामुळे या उपक्रमाचा शुभारंभ करण्यासाठी पुणे शहर ही स्वाभाविक निवड ठरली. वाहतूक पोलीस कर्मचारी हे तीव्र उष्णता आणि निर्जलीकरणसारख्या परिणामांना सर्वाधिक सामोरे जाणाऱ्या घटकांपैकी एक आहेत. त्यांच्या आरोग्याला पाठबळ देण्याबरोबरच व्यापक जनजागृती करण्याचा आमच्या प्रयत्नाचा एक भाग आहे. शरीरात पाण्याची पुरेशी पातळी राखणे, हे दैनंदिन आरोग्यातील मूलभूत घटक आहे, हा पोकारी स्वेटचा ठाम विश्वास आहे आणि अशा उपक्रमांद्वारे लोकांना शरीरात पाण्याची पुरेशी पातळी राखण्याच्या अधिक चांगल्या सवयी अंगीकारण्यास प्रोत्साहन मिळेल.

# थोडक्यात पण महत्वाचे



## धरण दुरुस्ती कामाची शेखर निकम यांच्याकडून पाहणी; कामाला गती

चिपळूण (स. गांवकरी) : डेरवण-राजेवाडी धरणाच्या दुरुस्तीसाठी रु. १४ कोटी ९९ लाखांचा निधी शासन स्तरावर पाठपुरावा करून आमदार शेखर निकम यांनी उपलब्ध करून दिला असून, या कामाची प्रत्यक्ष पाहणी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह केली. सन २०२५ पासून सुरू असलेल्या या दुरुस्ती कामाचा आढावा घेताना आमदार निकम यांनी चिपळूण जलसंधारण विभागाचे उपअभियंता सागर भराडे, जिल्हा परिषद सदस्या पूजा निकम, जि. प. सदस्य संजय कदम तसेच ग्रामस्थ यांच्यासमवेत कामाची स्थिती जाणून घेतली. यावेळी उपअभियंता सागर भराडे यांनी धरणाच्या दुरुस्तीबाबत माहिती देताना सांगितले की, धरणाचे काम सध्या जलद गतीने सुरू असून मातीकाम २० मे २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच गेट वॉल्व बसविण्याचे कामही मे अखेरपर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. यावर्षी साधारण ४० टक्के पाणीसाठा धरणात साठेल, अशी अपेक्षा आहे.



## नागवडे स्कूलचे यश; बालचित्रकारांची बक्षिसांवर झडप

श्रीगोंदा (स. गांवकरी) : रंगोत्सव सेलिब्रेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रंगोत्सव चित्रकला स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूल व कौशल्यादेवी नागवडे इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. विविध वयोगटांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत बालचित्रकारांनी आकर्षक रंगसंगती व कल्पकतेच्या जोरावर बक्षिसांवर अक्षरशः झडप घातली. या स्पर्धेत एकूण ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. ए+ श्रेणी मिळवत प्रथम ते आठ क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : स्वरा जामदार (मिनी प्रोजेक्टर), अंश ढवळे (क्रिकेट किट), आराध्या जगताप (हेडफोन), आनंदिता जाधव (स्विमिंग पूल किट), विहान गुणवरे (रोलर स्केट), आयुष परकाळे (फुटबॉल), तनिष्का खेतमाळीस (स्कूल बॅग) आणि वेदांत गाडेकर (स्कूल बॅग). स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना सरिता सुपेकर व सोनाली पिटेकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, निरीक्षक एस. पी. गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## न्यू इंदिरानगर येथील सॅटिस पूल प्रकल्पातील बाधितांना दिलासा



ठाणे (स. गांवकरी) : ठाण्यातील कोपरी विभागातील न्यू इंदिरानगर परिसरातील सॅटिसपूल प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना अखेर दिलासा मिळाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रहिवाशांच्या प्रश्नाला प्राधान्य देवून खासदार नरेश म्हस्के यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे न्यू इंदिरानगर परिसरातील नागरिकांना ॲक्मे, खेवरा सर्कल, मानपाडा येथे पर्यायी घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. बुधवारी आनंदाश्रम येथे खासदार नरेश म्हस्के व महापौर दालनात महापौर शर्मिला पिंपळोलकर व स्थानिक नगरसेविका मालती पाटील यांच्या हस्ते चाव्यांचे वाटप करण्यात आले. ठाणे कोपरी येथील न्यू इंदिरानगर परिसरात रेल्वे प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या नागरिकांना स्थानिक नगरसेविका महापौर शर्मिला पिंपळोलकर, मालती पाटील, नम्रता पमनानी, नगरसेवक भरत चव्हाण यांनी दिलासा दिला. या नागरिकांना पर्यायी घरे उपलब्ध करुन द्यावीत यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार नरेश म्हस्के यांच्याकडे सततचा पाठपुरावा करुन प्रशासनाच्या माध्यमातून खेवरा सर्कल येथे त्यांना पर्यायी घरे उपलब्ध केली. बुधवारी टेंभीनाका आनंदाश्रम येथे खासदारनरेश म्हस्के यांच्याहस्ते प्रातिनिधीक स्वरुपात 10 बाधित रहिवाशांना घराच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले. तर उर्वरित रहिवाशांना महापौर शर्मिला पिंपळोलकर, सभागृह नेते हणमंत जगदाळे, ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे, स्थानिक नगरसेविका मालती पाटील यांच्या हस्ते चाव्यांचे वाटप करण्यात आले. या रहिवाशांना पर्यायी घरे मिळाल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी रोहित पिंपळोलकर, रमाकांत पाटील, संतोष सातकर, विकास पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## शुभांगी राऊतमारे, कथालेखन स्पर्धेत सौ. श्रद्धा वझे यांना प्रथम पारितोषिके

पाथर्डी (स. गांवकरी) : शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य व कथालेखन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून विविध जिल्ह्यांतील साहित्यिकांनी या स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कविता लेखन स्पर्धेत परभणी येथील शुभांगी राऊतमारे व कथालेखन स्पर्धेत कल्याण येथील सौ.श्रद्धा वझे यांना प्रथम पारितोषिके जाहीर करण्यात येत असल्याची माहिती परिषदेचे कार्यवाह शाहिर भारत गाडेकर व सहसचिव प्रा.डॉ.अनिल गर्जे यांनी दिली. कविता लेखन स्पर्धेत परभणी येथील शुभांगी राऊतमारे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर बीड येथील श्रीराम अजब यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक माखजन (ता. संगमेश्वर) येथील श्रीमती वर्षा पोंक्षे यांना मिळाला असून उत्तेजनार्थ पारितोषिक कोलखेडा (जि. अकोला) येथील तुळशीराम बोबडे व पुणे येथील श्रीपाद टेंबे यांना जाहीर करण्यात आले आहे. कथालेखन स्पर्धेत कल्याण येथील सौ.श्रद्धा वझे यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर देवरुख (ता.संगमेश्वर)येथील शरयू गीते यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.तृतीय क्रमांक अहिल्यानगर येथील सौ.प्रमिला वाघ यांना मिळाला असून उत्तेजनार्थ पारितोषिक अकोला येथील स्वाती पुरी यांना जाहीर करण्यात आले आहे.

# कुपोषण मुक्त करण्यासाठी सक्षम अधिकारी द्या

अकोले : (स. गांवकरी)



अकोले आदिवासी तालुक्यातील 'सॅम' , 'मॅम' बालके व दुर्धर आजार असलेली बालके यांची संख्या वाढत असल्याने आवश्यकत्या उपाययोजना करण्याबाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे व तालुका पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवराम डगळे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, भाऊसाहेब आभाळे, राजेंद्र गवांदे यांनी दिली आहे. निवेदनात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकोले व राजुर या प्रकल्पांच्या माध्यमातून कुपोषित बालकांचे सातत्यांने सर्वेक्षण, सर्व्हे केले जाते व तालुका आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आणि ग्रामीण रुग्णालय अकोले येथील अधिनस्त कार्यरत आर.बी.एस.के पथक केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक अंगणवाड्यांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी केली जाते.

वाड्या-वस्त्यांमध्ये सर्वेक्षण करून कमी वजन व कमी उंची असलेले बालकांच्या शोध घेतला जातो. कमी वजनाच्या बालकांना नाचणी पासून बनवलेला आहार, पदार्थ तसेच गूळ, शेंगदाणे, लाडू व गावरान तूप, अमृत आहारामध्ये अंडी व केळी पोषण कल्पवडी, जीवनसत्व युक्तक्षार, सूक्ष्म पोषण तत्वे असलेले आहाराचे किट देण्यात येते, व औषधउपचार करण्यात येतात.

पोषण अभियानाद्वारे पालक सभा, पोषण रॅली, महिला मेळावे व माता बैठका घेण्यात येतात. पोषण माह, महिना व पंधरवडा पोषण आहार अभियान राबवण्यात येते.

अकोले तालुक्यात आदिवासी भागातील स्तनदा माता, गरोदर मातांना योग्य आहार देण्याचे नियोजन अंगणवाडीच्या माध्यमातून दिले जाते. आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक वर्षांपासून केंद्र सरकार, राज्य सरकार विविध उपाययोजना राबवत आहे. कोट्यावधी रुपये खर्च करते मात्र तो खर्च व्यर्थ झाल्याचे कुपोषण आकडेवारी मुळे उघड होत आहे व दिसत आहे.

बालविकास प्रकल्प अधिकारी अकोले व राजुर यांची जागा नेहमी वर्षे, दोन वर्षांपासून रिक्त असून प्रभारी अधिकारी यांच्याकडे चार्ज आहे तातडीने तेथे सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. तसेच निवेदनात तालुक्यात 38 बालके तीव्र कुपोषित, मध्यम कुपोषित गटात 338 तर 18 बालके दुर्धर आजाराने ग्रस्त, अकोले आदिवासी भागातील बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा अकोले, जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेणकर, सचिव राम रुद्रे, प्रा.डॉ.सुनील शिंदे, माधवराव तिटमे, भाऊसाहेब वाकचौरे, ॲड.दीपक शेटे, ॲड.राम भांगरे, सिताराम भांगरे पाटील, रामहरी तिकांडे, प्रमोद मंडलिक, भाऊसाहेब वाळूंज, रामदास पवार, अशोक उघडे, राजेंद्र गवांदे, मोहन मुंडे, अनंत घाणे, हरिभाऊ अस्वले, सुनील देशमुख, पांडुरंग पथवे, जालिंदर बोडके, किरण चौधरी, रामदास पांडे, दत्ता ताजणे, राजेंद्र लहामगे, संतोष मुतडक, गंगाराम धिंदळे, गणपत थिगळे, सुरेश गभाले, पांडुरंग खाडे, तुकाराम खाडे, ज्ञानेश्वर पुंडे, भाऊसाहेब गोर्डे, कैलास तळेकर, सुदाम मंडलिक आदींची नावे आहे.

निवेदनाच्या प्रति माहितीसाठी राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण,महिला बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा परिषद जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.बा.वि) अहिल्यानगर तहसीलदार अकोले, पंचायत समिती अकोले, गटविकास अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहे.

## समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे अभिमानास्पद यश

बेल्हे : (स. गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेल्हे च्या अंतिम वर्ष बी.फार्म विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे. संस्थेच्या चार विद्यार्थ्यांनी GPAT (Graduate Pharmacy Aptitude Test) व GATE (Graduate Aptitude Test in Engineering) 2026 या परीक्षांमध्ये यश मिळवले आहे. GPAT 2026 मध्ये कु. तांबोळी मेहर (स्कोअर: 220 | AIR: 1682), कु. सीमा घोडे (स्कोअर: 201 | AIR: 2867) आणि कु. आरती वाघमारे (स्कोअर: 197 | AIR: 3223) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. तर GATE 2026 मध्ये कु. वैष्णवी लंघे (स्कोअर: 384 | AIR: 5190) हिने यश मिळवत संस्थेचा




गौरव वाढवला. या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, समर्पण आणि शिस्तबद्ध अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या यशामागे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीचे प्रमुख प्रा. शुभम गडगे तसेच त्यांच्या सहकारी शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश संपादन करता आले.

## काबुनीकडून शेन वॉटसन 'सुपर कोच' म्हणून नियुक्त

*जागतिक क्रिकेट प्रशिक्षणाचे स्वरूप पालटण्याच्या महत्त्वाकांक्षेला पाठबळ*

मुंबई : (स. गांवकरी)

क्रिकेट प्रशिक्षणाची व्याख्या बदलणाऱ्या एआय आधारित 'काबुनी' या स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मने आज ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू खेळाडू शेन वॉटसन याची 'सुपर कोच' म्हणून नियुक्ती केल्याचे जाहीर केले. जगभरातील सर्व स्तरांतील खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या मोहिमेसाठी टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. काबुनीचे प्रगत तंत्रज्ञान आणि शेन वॉटसनचा क्रिकेटमधील दांडगा अनुभव या दोघा घटकांना या भागीदारीने एकत्र आणले आहे आणि त्यामुळे उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी डेटावर आधारित अचूक माहिती आणि प्रत्यक्ष मैदानावरील अनुभव यांचा एक शक्तिशाली मिलाफ होणार आहे. काबुनीचा हा मंच खेळाडूची हालचाल आणि चेंडूचा मार्ग रिअल-टाइममध्ये टिपतो.




त्यामुळे पारंपारिक 'नेट प्रॅक्टिस'चे स्वरूप या पध्दतीमुळे बदलले गेले आहे. हे तंत्रज्ञान खेळाडूला साध्या आणि विविध कृतीशील सूचना देते. "एक टक्के सुधारणा" या अनोख्या दृष्टिकोनामुळे ही प्रणाली खेळाडूच्या लहान आणि त्वरित केल्या जाणाऱ्या सुधारणांवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे कालांतराने खेळाडूच्या कामगिरीत मोठी प्रगती दिसून येते.

आवाज, व्हिडिओ आणि दृश्य संकेत यांचा एकत्रित वापर करून, काबुनी हे सुनिश्चित करते की खेळाडूंना मिळणाऱ्या सूचना या केवळ माहितीचा डोंगर ठरत नाही, तर या सूचना सहज समजण्याजोगा आणि अंमलात आणण्यासाठी सोप्या ठरतात. विशेषतः तरुण आणि प्रगतीचे नवीन शिखर गाठणाऱ्या खेळाडूंसाठी ही पध्दत अत्यंत उपयुक्त राहणार आहे.

शेन वॉटसन या उपक्रमात सामील झाल्यामुळे, उच्च दर्जाची क्रिकेट बुद्धिमत्ता आणि सहज उपलब्ध होणारे तंत्रज्ञान एकत्र आणण्याची काबुनीने आपली वचनबद्धता आणखी बळकट केली आहे. उच्च दर्जाचे प्रशिक्षण केवळ व्यावसायिक वातावरणापुरते मर्यादित राहू नये, या काबुनीच्या विश्वासाला यामुळे अधिक बळकटी मिळाली आहे.

काबुनीचे सुपर कोच शेन वॉटसन नव्या जबाबदारीबद्दल बोलताना म्हणाले, काबुनीबद्दल मला जाणवलेली सर्वाधिक उत्कंठावर्धक बाब म्हणजे, प्रगती साध्य करण्याची पद्धत त्यांनी अतिशय सोपी केली आहे. क्रिकेट हा खेळ 'बारीक फरकांचा' आहे, आणि ते १ टक्के बदल ओळखून त्यानुसार कृती करण्याची क्षमता खेळाडूच्या शैलीत मोठा बदल घडवू शकते. कोणत्याही स्तरावरील खेळाडूंना सहज समजेल आणि त्यांना त्याचा फायदा होईल, अशी स्पष्टता काबुनी आपल्या प्रशिक्षणात आणते.

## महापुरुषांच्या विचारांची जोपासना ‘इम्पा’कडून – प्रा. अजित खरसडे

### फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम; ‘इम्पा जीवनगौरव २०२६’ पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशन (इम्पा), दिल्ली यांच्या श्रीगोंदा तालुका शाखेतर्फे नूतन कार्यकारिणी पदग्रहण समारंभ तसेच महात्मा जोतीराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा दि. १४ एप्रिल २०२६ रोजी काष्टी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

या निमित्ताने सकाळच्या सत्रात निमगाव खलु येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला, तर दुपारच्या सत्रात श्रीगोंदा कारखाना परिसरातील डॉ. पाखरे हॉस्पिटल येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

सायंकाळी काष्टी येथील राजनंदिनी हॉलमध्ये आयोजित मुख्य कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील समर्पण, कौशल्य, रुग्णकेंद्रित सेवा व सामाजिक बांधिलकी यासाठी




‘इम्पा जीवनगौरव पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आला. दौंड येथील प्रख्यात नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड तसेच श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे जेष्ठ सदस्य डॉ. संजीव कथुरिया यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रा. अजित खरसडे यांनी ‘भारतीय व्यवस्थेतील महापुरुषांचे योगदान’ या विषयावर व्याख्यान देताना इम्पाच्या उपक्रमांचे कौतुक केले. इम्पा ही संघटना महापुरुषांच्या विचारधारेवर चालणारी असून सामाजिक बांधिलकी जपत कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच भारत भूषण पुरस्कारप्राप्त डॉ. प्रविण बढे यांनी जीर्ण व्याधींवरील नैसर्गिक आरोग्य चिकित्सा व आयुर्वेदिक उपचार पद्धती याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात डॉ. अनिल कोकाटे, डॉ. राजेश पाखरे, डॉ. मुकुंद भोर, डॉ. विशाल मिसाळ, डॉ. राजेश दाते, डॉ. नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच डॉ. सौ. मीनाक्षी मोटे यांच्या निवडीबद्दल आणि समर्थ राहिंज यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल इम्पाच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मोहन लबडे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इम्पाचे गव्हर्नर डॉ. प्रमोद गायकवाड, अध्यक्ष डॉ. गणेश बारगळ पाटील, उपाध्यक्ष डॉ. किरण पवार, सचिव सागर ठवाळ, खजिनदार डॉ. विजय लाळगे, सहसचिव डॉ. सोनाली गदादे, सहखजिनदार डॉ. चैताली मखरे यांसह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## राहुरी विधानसभा मतदारसंघामध्ये आदेश जारी

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

२२३-राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी दि. २३ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ व ३३ (१) (ओ) नुसार मतदारसंघात कोणत्याही व्यक्तीस गैरकृत्य करण्यास दि. ४ मे २०२६ पर्यंत मनाई करणारे आदेश जारी केले आहेत. आदेशानुसार मतदारसंघामध्ये कोणत्याही व्यक्तीस रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही मिरवणुका, रॅली, सभा ठरविलेल्या मार्गाव्यतिरिक्त नेण्यास तसेच दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त आणि वेळेव्यतिरिक्त इतर मार्गाने नेण्यास व वेळेचे उल्लंघन करण्यास मनाई आहे. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी आणि प्रार्थनास्थळांच्या आसपास प्रार्थनेच्या वेळी कोणत्याही रस्त्यावरील किंवा सार्वजनिक जागी लोकांनी एकत्र जमण्याच्या ठिकाणी गर्दी करण्यास किंवा अडथळा निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे. सर्व रस्त्यांवर, रस्त्यामध्ये, घाटात, घाटावर, सर्व धक्क्यांवर किंवा धक्क्यामध्ये, जत्रा, देवालय, मशीद, दर्गा आणि सार्वजनिक लोकांच्या जाण्या-येण्याच्या जागांमध्ये गोंधळ घालण्यास, बेशिस्तपणे वागण्यास मनाई आहे. कोणत्याही रस्त्यात, रस्त्याजवळ किंवा अनियमित व विनापरवाना सार्वजनिक जागी वाद्ये वाजवण्यास, गाणी म्हणण्यास, ढोल-ताशे वाजवण्यास मनाई करण्यात आली आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरचे दैदिप्यमान आणि अभिमानास्पद यश

संगमनेर : (स. गांवकरी)

शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि सर्वांगीण विकास यांचा उत्कृष्ट संगम साधणाऱ्या पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील CBSE बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व, दैदिप्यमान आणि अभिमानास्पद यश संपादन करत आपल्या शैक्षणिक कार्याची भक्कम छाप उमटवली आहे. विशेष म्हणजे, यावर्षी शाळेच्या पहिल्याच बॅचने बोर्ड परीक्षा दिली असून विद्यार्थ्यांनी मिळवलेला हा उत्कृष्ट निकाल शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेचा, दूरदृष्टीपूर्ण नियोजनाचा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा जिवंत पुरावा ठरला आहे

या परीक्षेसाठी एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ४०% विद्यार्थ्यांनी ९०%




पेक्षा अधिक गुण मिळवले, ही बाब शाळेच्या उच्च शैक्षणिक दर्जाची साक्ष देणारी आहे. याचबरोबर ८०% विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय प्राविण्य संपादन केले, तर २० विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळवत उत्तम यश मिळवले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ७ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा अधिक गुण मिळवत उत्कृष्टतेचा उच्चांक गाठला, ज्यामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रचीती आली.

या यशामध्ये कु. निवेदिता नव्हाटे (९९.४०%) हिने अत्युत्कृष्ट कामगिरी करत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला असून तिच्या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, नियोजनबद्ध तयारी आणि चिकाटी यांचा मोठा वाटा आहे. तिच्या पाठोपाठ कु. समृद्धी मिंडे (९९%) हिने द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्रिशा बिबवे (९७.४०%) तिसऱ्या क्रमांकावर असून मुक्ता गिरी (९७.४०%), अमेय भरितकर (९७.४०%), अक्षरा गुंजाळ (९६.४०%), अनन्या राऊत (९६%), अस्मिता दिघे (९५.८०%), इच्छा गुप्ता (९५.६०%) यांनीही उच्च गुणवत्तेची कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

तसेच ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विश्वेश वर्मा (९४.६०%), अनुष्का लाड (९४.२०%), कनिष्क काकड (९३.४०%), युगंधरा गाडेकर (९२.६०%), दर्शन गायकवाड (९२.२०%), साईराज गुंजाळ (९२%), कृष्णा वैद्य (९१.४०%), सार्थक मैड (९१%), अदिती गुंजाळ (९०.१६%), संस्कृती पोकळे (९०%), देवांश नवले (९०%) यांचा समावेश असून या सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध अभ्यास, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे।

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विषयानुसारही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले असून माहिती तंत्रज्ञान (IT) विषयात ६ विद्यार्थ्यांनी १००/१०० गुण मिळवले आहेत, तर इंग्रजी विषयात १ विद्यार्थ्याने आणि हिंदी विषयात १ विद्यार्थ्याने १००/१०० गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले आहे.

या भव्य यशामागे शाळेच्या सक्षम आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा तसेच शिक्षकांच्या अथक परिश्रमांचा मोठा वाटा आहे. प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा, उपप्राचार्य श्री. योगेश आवारी, माध्यमिक समन्वयक श्री. शंकरषण मुसमाडे,एडमिन ऑफिसर सागर नेरपगार तसेच इयत्ता दहावीच्या सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन, वैयक्तिक लक्ष आणि प्रेरणा देत त्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. शाळेत राबविण्यात आलेल्या नियोजनबद्ध अध्यापन पद्धती, नियमित सराव परीक्षा, संकल्पनांवर आधारित शिक्षण, वेळोवेळी घेतलेले पुनरावलोकन सत्रे आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक तयारीसाठी दिलेले मार्गदर्शन यामुळे हा उत्कृष्ट निकाल साध्य झाला आहे।

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# नवी मुंबईत पत्रकार विष्णू बुरे यांची सतर्कता

## रस्त्यावरचे दगड हटवून टाळला मोठा अपघात!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

नवी मुंबई एमआयडीसी परिसरातील मुख्य रस्त्यावर अचानक भलेमोठे दगड पडल्याने वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला होता. हा रस्ता अत्यंत वर्दळीचा असल्याने कधीही भीषण अपघात घडू शकला असता. विशेषतः दुचाकीस्वार आणि रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही परिस्थिती अधिकच धोकादायक ठरत होती. या गंभीर बाबीकडे अनेकांचे दुर्लक्ष होत असतानाच पत्रकार व समाजसेवक विष्णू बुरे यांच्या लक्षात ही घटना आली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. कोणतीही यंत्रणा किंवा मदतीची वाट न पाहता त्यांनी स्वतःच रस्त्यावर उतरून एक-एक करून ते मोठे दगड बाजूला केले. त्यांच्या या तत्पर, धाडसी आणि जबाबदारीपूर्ण कृतीमुळे संभाव्य मोठा अपघात



टळला. काही वेळासाठी वाहतूक सुरळीत होईपर्यंत त्यांनी स्वतः लक्ष देत नागरिकांना सुरक्षित मार्गदर्शनही केले. या घटनेनंतर तेथून जाणाऱ्या वाहनचालकांनी सुटकेचा श्वास घेत विष्णू बुरे यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. "अशा प्रसंगी तत्काळ पुढाकार घेणारे नागरिक समाजासाठी आदर्श ठरतात," अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या घटनेमुळे प्रशासनानेही रस्त्यांच्या देखभालीकडे अधिक लक्ष देण्याची गरज अधोरेखित झाली आहे. विष्णू बुरे यांच्या या कृतीमुळे केवळ एक अपघात टळला नाही, तर समाजात जबाबदारीची जाणीव आणि सतर्कतेचे महत्त्वही अधोरेखित झाले आहे.



ठाणे : दिवा शहरात पदवीधर आमदार निरंजन डावखरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने भारतीय जनता पार्टीचे दिवा शिळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा अनुसूचित मोर्चा ठाणे जिल्हा सरचिटणीस श्री सतीश केळशीकर यांनी दिवा शहरातील गरीब व गरजुंना अन्नधान्य किट वाटप करण्यात आले.

( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### इंडो स्कॉट्स ग्लोबल स्कूल, ठाणेचा दहावीचा निकाल दैदिप्यमान

ठाणे (स. गांवकरी) : पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इंडो स्कॉट्स ग्लोबल स्कूलचा इयत्ता दहावी (CBSE) परीक्षा २०२६ चा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून विद्यालयाने यंदाही उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. कु. सुरभी रानडे हिने 99.6% गुण मिळवत राज्यातील अव्वल विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवले. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि सखोल तयारीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले. तसेच कु. सई खेडेकर व मास्तर संकल्प शिंदे यांनी प्रत्येकी 96.6% गुण मिळवले, तर मास्तर श्रेयस खुले यांनी 96% गुण प्राप्त केले. इतर अनेक विद्यार्थ्यांनीही उच्च श्रेणीत यश मिळवत विद्यालयाचा निकाल अधिक भक्कम केला. विद्यालयाचा एकूण निकाल उच्च टक्केवारीत लागला असून अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या यशामागे शिक्षकवृंदाचे परिश्रम, विषयप्रमुखांचे मार्गदर्शन व समन्वयकांचे नियोजनबद्ध काम महत्त्वाचे ठरले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या परिश्रम व जिद्दीचे अभिनंदन केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### तोफखाना पोलीस ठाण्याचा अंमलदार ३५ हजार रूपयांच्या लाचेच्या जाळ्यात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस अंमलदाराला ३५ हजार रूपयांची लाच स्वीकारताना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. बुधवारी (१५ एप्रिल) सायंकाळी तोफखाना पोलीस ठाणे परिसरात ही कारवाई करण्यात आली. अनिल गोसावी असे पकडलेल्या पोलीस अंमलदाराचे नाव असून या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. छळ प्रकरणी पीडित विवाहितेने पतीविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. या प्रकरणाच्या तपासादरम्यान संबंधित संशयित आरोपीला मदत करण्यासाठी पोलीस अंमलदार अनिल गोसावी याने तक्रारदाराकडे ५० हजार रूपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. त्यानुसार पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला.गेल्या बुधवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास तोफखाना पोलीस ठाणे परिसरात ही कारवाई करण्यात आली. सापळ्यानुसार, गोसावी याने ५० हजारांच्या मागणीपैकी ३५ हजार रूपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती. तक्रारदाराकडून ३५ हजार रूपये स्वीकारत असताना लाचलुचपत विभागाच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. या घटनेची माहिती पोलीस दलात पसरताच पोलीस ठाण्यात मोठी खळबळ उडाली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गोसावी याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## अल्पवयीन मुलीवर नराधम बापासह दोघांचा बलात्कार

जामखेड : (स. गांवकरी)

जामखेड तालुक्यात वडील व मुलीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. एका साडेतेरा वर्षीय पिडीत अल्पवयीन मुलीवर बापाने व एका हॉटेल चालकाने बलात्कार केल्याची घटना घडली आहे. धक्कादायक म्हणजे पिडीत अल्पवयीन मुलगी ही तीन महीन्यांची गर्भवती आसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी मुलिचा बाप व हॉटेल चालक अशा दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असुन या प्रकरणी पोक्सो, बलात्कार यासह विविध कलमान्वये जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की संगमनेर तालुक्यातील आनंदवाडी परिसरात पिडीत मुलगी ही आपल्या आजी, आजोबा व वडीलांसह रहात आहे. मुलीच्या आईचे एक वर्षापूर्वीच



निधन झाले आहे.

मुलगी संगमनेर तालुक्यातील आश्रम शाळेत शिकत आहे, मात्र ऑक्टोंबर २०२५ रोजी दिवाळीच्या सुट्या लागल्या आसल्याने पिडीत मुलगी ही आपले आजी आजोबा व वडील हे जामखेड तालुक्यातील सरदवाडी भागात ऊस तोडण्यासाठी आले होते त्या ठिकाणी मुलगी देखील आली होती. या भागातील एका हॉटेलवरील नळावर पिडीत मुलगी आपल्या आजी सह पाणी आणण्यासाठी जात असे, यावेळी हॉटेल चालकाची तीच्यावर नजर पडली.

मुलीचे घरचे ऊसतोडणी साठी बाहेर गेल्यावर हॉटेल चालक आरोपी जयदत्त सदाशिव कात्रजकर (उर्फ) नाना रा. कुसडगाव ता. जामखेड जि. अहिल्यानगर याने मुलीस जवळच आसलेल्या मक्याच्या शेतात नेहुन तीन वेळा अत्याचार केला. तसेच हा प्रकार कोणाला सांगितला तर तुला जीवे मारुन टाकेल अशी धमकी दिली. यानंतर पिडीत मुलीचा बाप नोव्हेंबर २०२५ रोजी दिवाळी नंतर आपल्या कुटुंबासह बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील सांगवी याठिकाणी उसतोडणीसाठी आला होता. त्या ठिकाणी देखील पिडीत मुलीच्या नराधम बापाने आपल्या पोटच्या मुलीवर नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत अनेक वेळा अत्याचार केला.

एप्रिल २०२६ मध्ये पिडीत मुलगी आपल्या संगमनेर तालुक्यातील आश्रम शाळेत वार्षीक परिक्षा आसल्याने ती परिक्षा देण्यासाठी दि ९ एप्रिल २०२६ रोजी आली होती. यावेळी शाळेकडून मुलीच्या आजीला मुलीची मेडीकल टेस्ट करण्यास सांगितले. सदर मुलीचे संगमनेर ग्रामिण रुग्णालय याठिकाणी मेडीकल टेस्ट केल्यानंतर पिडीत अल्पवयीन मुलगी ही तीन महीन्यांची गर्भवती आसल्याची धक्कादायक माहिती समोर आली.

## आगीच्या वणव्यात फळझाडांचे मोठे नुकसान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुक्यातील सारोळा कासार - अकोळनेर शिवेलगत असलेल्या जांभळदरा परिसरात १४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास वणवा पेटून मोठी आग लागली. या आगीत परिसरातील ९ शेतकऱ्यांच्या शेतातील फळझाडे व इतर प्रकारची झाडे होरपळून निघाली, तर या शेतकऱ्यांच्या शेतातील ठिबक चे पाईप, शेततळ्याचे कागद, विहिरी, बोअरवेलच्या पाईपलाईनही जळाल्या असून या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दुपारी ३ च्या सुमारास लमाणबाबा देवस्थान पासून काही अंतरावर असलेल्या डोंगरावर अचानक वणवा पेटला. दुपारी वेळ आणि कडक उन त्यामुळे आगीने काही काळातच रौद्र रूप धारण केले. डोंगरावरून ही आग जवळच असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात पसरली. परिसरातील नागरिकांना आगीच्या ज्वाला व धुराचे लोट दिसू लागल्यावर नागरिकांनी तिकडे धाव घेतली. मात्र आग विझवण्यासाठी कुठलीही साधने उपलब्ध नसल्याने आणि आगीने रौद्र रूप धारण केलेले असल्याने नागरिकांना काहीच करता आले नाही. या आगीत सुधाकर रंगनाथ धामणे यांच्या शेतातील चंदन, कडूनिंब, मलबारलिंब आदी झाडे, विशाल मधुकर धामणे, सुभाष भास्कर धामणे, विलास गंगाधर धामणे, वनाजी गंगाधर धामणे या शेतकऱ्यांच्या शेतातील चिंचेची झाडे, संजय आप्पासाहेब धामणे यांच्या शेतातील संत्र्याची बाग, ज्ञानदेव भाऊसाहेब धामणे व पोपट भाऊसाहेब धामणे यांच्या शेतातील आंब्याची बाग, राजेंद्र आप्पासाहेब धामणे यांच्या शेतातील आंब्याच्या झाडांचे नुकसान झाले आहे.

## उष्णतेपासून दिलासा नाही; १५ जिल्ह्यांना 'येलो अलर्ट'

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विदर्भात तीव्र उष्णतेची लाट असून पारा ४४ अंशांपलीकडे गेला आहे. विशेषतः अकोला, अमरावतीत उष्णतेचा कहर आहे. अकोल्यात बुधवारी अक्षरशः ४४.२ अंश सेल्सिअस तर अमरावती शहरात ४४ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. अकोला सलग चौथ्या दिवशी भारतातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले. तर जगातही ते सर्वाधिक उष्ण ठरले. वर्धा, नागपूर या शहरात देखील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. आणखी काही दिवस वैदर्भीयांना हा ताप सहन करावा लागणार आहे. राज्यातील बहुतांश भागात उष्णतेची लाट कायम आहे. विदर्भात तापमान ४४ अंश सेल्सिअस पलीकडे तर मराठवाड्यात देखील पारा ४३ अंशापालिकडे गेला आहे. १६ एप्रिलला राज्यातील १५ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान स्थिती कायम आहे. मुंबईसह संपूर्ण कोकणात आज पुन्हा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात देखील उष्णतेचा पारा चढला असून सूर्य आग ओकत असल्याचे चित्र आहे. पुण्यासह संपूर्ण मध्य महाराष्ट्रात हवामान मुख्यतः कोरडे राहील. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत उष्णतेची लाट आहे. मराठवाड्यात देखील उष्णतेची लाट आहे. छत्रपती संभाजीनगरसह जालना, हिंगोली, परभणी आदी जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी केला आहे. उत्तर महाराष्ट्रात देखील उष्णतेचा पारा चढला आहे. राज्यात एप्रिलच्या सुरुवातीला पावसाने हजेरी लावली होती, मात्र दुसऱ्या आठवड्यापासून उन्हाचा चटका असह्य झाला आहे. बुधवारी १५ एप्रिलला अकोल्यात ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे तापमान सलग दुसऱ्या दिवशी देशातील सर्वाधिक होते. अकोल्यापाठोपाठ अमरावती येथे ४४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.

## बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जल्लोषात साजरी

खर्डी: (स. गांवकरी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त खर्डी ग्रामपंचायत तसेच खर्डी परिसरात विविध ठिकाणी उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

खर्डी ग्रामपंचायतीत यावेळी सरपंच सौ. मंगला गावित यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला. तसेच उपसरपंच प्रशांत खर्डीकर व सभासद प्रांजली केदारे खर्डी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक दीपक साबळे,दिलीप अधिकारी,मनीष दोंदे यांच्या वतीनेही हार अर्पण करून बाबासाहेबांना प्रणाम करत शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच पंचशील नगर बुद्ध विहार, महात्मा फुले कॉलनी,आनंद नगर खर्डी येथे बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

याचबरोबर खर्डी नाक्यावर चालक-मालक संघटना (जीप चालक), तसेच खर्डी भारतीय जनता पार्टी (भाजप शहर) यांच्या वतीनेही जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन विजय परदेशी,प्रकाश सांडे यांनी केले होते. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण



सेना खर्डी शहर कार्यालयातही शगीर शेख व अण्णा कुमावत यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मोठ्या संख्येने विविध राजकीय पक्षाचे नेते ,ग्रामस्थ, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित राहून या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. खर्डी बाजारपेठेत बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जयंती कमेटीचे अध्यक्ष जितेश जाधव यांनी स्व खर्चाने अभिवादन सभेचे आयोजन केले होते. ह्या सर्व ठिकाणी बौद्धाचार्य सिद्धांत जाधव यांनी प्रास्ताविक व वंदना घेऊन कार्यक्रम यशस्वी केले. संध्याकाळी पंचशील नगर येथून जयंतीची मिरवणुकीचा रथ फटाक्यांच्या आतिषबाजीने वाजत गाजत जल्लोषात सुरू झाला. यानंतर पंचशील नगर बोर्ड , स्टेशन बाजार पेठ, तलाठी ऑफिस, महात्मा फुले कॉलनी ,खर्डी हायवे नाका ,खर्डी बाजारपेठ ,खर्डी देवी मंदिर, त्यानंतर खर्डी आनंदनगर येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. खर्डी स्टेशन येथील मज्जित कमिटीने बौद्ध बांधवां सरबतचे वाटप ठेवले होते .खर्डी गावातही मुस्लिम समाजाच्या वतीने बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच गणेश जाधव,गणेश राऊत , शैलेश खर्डीकर,धनंजय बागुल, उपेंद्र पवार,निखिल बेंडकुळे,आसिफ शेख, मुजफर कोतवाल, अक्षय पवार व विविध पक्षाच्या नेत्यांनी अभिवादन केले. यावेळी मिरवणुकीच्या दरम्यान ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी, पोलीस डिपार्टमेंट ,एमएसईबी, ग्रामपंचायत, तसेच इतर राजकीय क्षेत्रातील पुढारी, समाज बांधव सर्वांनी या सर्वांनी मिरवणुकी दरम्यान मोलाचे सहकार्य केल्याबद्दल सगळ्यांचे आभार व्यक्त करून मिरवणुकीची शांततेत सांगता करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन जयंती कमेटीचे अध्यक्ष जितेश जाधव,उपाध्यक्ष - मनोज केदार, सचिव - अस्मित चिकने,खजिनदार - विशाल जाधव व इतर समिती सदस्य राजेश चिकणे,नितीन जाधव, राजेश चव्हे,समीर गायकवाड, संदेश बर्वे,प्रशांत पवार,गजानन केदारे,तसेच सल्लागार - संजय निकाळे,नितीन भालेराव, प्रकाश जाधव, मनिष दोंदे, प्रकाश धाबे,संजय धाबे इ मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा उष्पूर्त सहभाग लाभला.संपूर्ण जयंती कमेटी महोत्सवात तरुण वर्गातील मुलांच मोलाचे सहकार्य लाभले तसेच प्रसाद निकाळे यांनी खूप मेहनत घेऊन मोलाचे सहकार्य केले आहे.

## पवार साहेब, याद्या आता हिंदू समाजाने पण केल्या आहेत !

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

**काही दिवसापूर्वी महाराष्ट्रातील आमचे तथाकथित जाणते नेते राज्यसभेत पुन्हा खासदार होण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यांचे सर्वपक्षीय मित्र पण ह्यासाठी पुष्कळ लॉबिंग करत होते .ह्या सर्वपक्षीय मित्रांचे प्रवक्ते संजय राऊत हे चमचेगिरी करत होतेच.**

दुसऱ्या वयस्कर नेत्यांच्या बद्दल बोलताना ते ही दादा जाधवराव ह्यांच्या सारख्या नेत्याबद्दल बोलताना बैल म्हातारा झाल्यावर त्याला बाजार दाखवावा लागतो असे वक्तव्य करणारे हे जाणते नेते स्वतःला कधीच म्हातारा समजत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे चमचे, मिडिया, इकोसिस्टिम त्यांचा एकतर्फी उदो उदो करत राहते.

पुन्हा खासदार होई पर्यंत शांत बसलेले हे महाशय शपथ विधी झाल्यावर प्रथम बोलले ते वारकरी संप्रदायातील घुसलेल्या तथाकथित धर्मांध शक्तींच्या बद्दल ! खरे तर संप्रदायातील सर्वांनी ह्याचा जितका होईल तितका कडक निषेध केला पाहिजे. चतुर्थी आणि एकादशी ह्या दिवशी मुद्दाम आहारात सामिष आहार करणारा हा गृहस्थ. देवाला रिटायर करून त्याचा बाप होऊ पाहणारा हा गृहस्थ. त्याचा तो चमचा विचारवंत म्हणणारा ज्ञानेश महाराव किंवा भालचंद्र नेमाडे ह्या नेत्याच्या उपस्थितीत जेंव्हा संप्रदायाच्या किंवा हिंदूंच्या दैवतांच्या बद्दल बोलतात तेव्हा गालातल्या गालात हसून ती टिंगल एन्जॉय करणारा हा नेता. ह्याला संप्रदायात साठ टक्के धर्मांध लोक घुसले आहेत असा जावई शोध लागला आहे.

धर्मांध ह्या शब्दाची ह्या नेत्याच्या पुरोगामी डायरीत असणारी व्याख्या फार सोपी आहे. हिंदू आणि हिंदुत्व ह्यावर स्पष्ट भाष्य करणारे म्हणजे धर्मांध . राममंदिराचा पुरस्कार करणारे धर्मांध . लव जिहाद नावाने देशभर आणि महाराष्ट्रात चालणारा जिहादी हैदोस ह्यांच्या दृष्टीने धर्मांधता नाही. मग ते अलीकडील परतवाडा असो किंवा नाशिक येथील TCS सारख्या नामांकित कंपनी मधील कॉर्पोरेट जिहाद असो. ह्या बळी जाणाऱ्या निष्पाप पोरी ह्यांच्या कुणी नाहीत ती धर्मांधता नाही पण ह्या विषयावर संप्रदायातील मंडळी आवाज उठवायला लागली, प्रबोधन करायला लागली की ह्यांचे 60%धर्मांधतेचे गणित लगेच चालू होते. एकादशीला मटण खाणे आणि त्याबद्दल आमच्या विठ्ठलाला मटण चालते असे म्हणून वैष्णव समाजाचा अपमान करणारी ह्यांची सुकन्या हे ह्यांचे पुरोगामित्व. आणि लोकांना सदाचाराला लावण्यासाठी कीर्तन , प्रवचन करणारे आमचे संप्रदायी हरी भक्त पारायण मात्र प्रतिगामी . वाह रे वाह पवार साहेब! कमाल आहे तुमची.

जातीच्या विद्वेषात महाराष्ट्रातील तरुणांस पेटवून त्यावर आपल्या सत्तेची पोळी भाजणे म्हणजे पुरोगामी लक्षण आणि लोककल्याणार्थ प्रबोधन करून लोकांना प्रेरित करणे म्हणजे प्रतिगामी.

पवार आणि त्यांच्या चेल्यांनी इतके दिवस सत्ता भोगली पण कधी वारकरी संप्रदायासाठी कुठला निवारा , स्वतंत्र रस्ता अथवा शौचालये बांधायचे डोक्यात घुसले नाही. पण गेल्या १२ वर्षात ते ज्यांना धर्मांध आणि प्रतिगामी म्हणत असतात त्याच प्रतिगामी , धर्मांध लोकांनी ह्या व्यवस्था उत्पन्न केल्या आहेत हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. वारकऱ्यांच्या भावना समजून त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी आपल्या राजकीय एजंट लोकांना वारकरी संप्रदायात घुसवून त्यांच्या करवी ज्ञानोबा तुकाराम ह्या अभेद्य घोषणेला पण जातीयवादी वळण देणारी तुमची नीच पातळी लोकांनी ओळखल्यामुळेच तुम्हाला झिडकारले आहे. धर्मांध लोक हे पंढरपूरच्या विठोबाचे भक्त नसतात . सगळ्या जगाला शांती लाभावी म्हणून प्रार्थना म्हणणारे धर्मांध असूच शकत नाहीत. बायबल आणि कुराण वाचून आमचाच (धर्म ) पंथ कसा श्रेष्ठ आहे हे सांगणारे आणि आपल्या तथाकथित पंथाची संख्या वाढावी म्हणून सर्व प्रकारचे साम , दाम आणि दंडभेद वापरून मतांतर करणारे जिहादी लोक हे खरे धर्मांध. वक्फ प्रॉपर्टी म्हणून आमची देवस्थाने बळकावणारे हे खरे धर्मांध ! मदरसे आणि चर्च हे धर्मांध बनवणारे कारखाने आहेत मंदिरे नव्हे !

कृपया नको त्या गोष्टींवर पवारांनी बोलून अजून स्वतःची उरली सुरली मान्यता गमावून बसू नये ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. महाराष्ट्रातले समाजजीवन तुमच्या सर्व विभाजनाच्या कुटिल कारवायांस पुरून उरून एक समरस, सद्भाव युक्त जीवन जगू इच्छित आहे त्यात तुमची वैचारिक विष वल्ली कालवून वातावरण बिघडवू नका. आपण ६० वर्षे हे उद्योग केले आता हा नवा महाराष्ट्र घडतो आहे .

सर्वत्र महाराष्ट्रात संपन्न होणारे हिंदू संमेलने आणि त्यात धर्माचार्य ह्यांची उपस्थिती , त्यांचे आशीर्वाद पर भाषणे ह्यामुळे होणारा संताप आणि महाराष्ट्र आपल्या हातातून पूर्ण पणे गेला आहे हया वास्तवाची जाणीव ह्यातून वारकरी संप्रदाय लक्ष केला जात असावा. पण आज जसा आहे तसाच वारकरी संप्रदाय महाराष्ट्राला हवा आहे . फक्त तुम्ही तुमच्या धर्मांध चमच्याना वारीत पाणी आणि खिचडी वाटायला पाठवायचे उद्योग बंद करा नाही तर एक दिवस वाट बघून असे उद्योग कसे बंद करायचे आणि तुमची तथाकथित पुरोगामी घुसखोरी कशी थांबवायची हे महाराष्ट्राला चांगले कळते. आणि तुम्ही म्हणता आम्ही यादी करायला सुरुवात केली आहे. अशा प्रकारे धमकी देणारी भाषा वापरताना तुम्ही कुठल्या जगात वावरत आहात ? ४८ साली गांधी हत्येच्या वेळी तुम्ही याद्या केल्या . ७५ साली आणीबाणीच्या निमित्ताने तुम्ही याद्या केल्या . ८४ साली शीख समाजाच्या याद्या केल्या . त्या प्रमाणे त्यांची घरे जाळली . जेलमध्ये पाठवले

पण काही उपयोग झाला नाही .ज्यांच्या याद्या केले तेच आता सर्वत्र सत्तेवर येऊन बसले. आता पवार साहेब याद्या करण्याचे तुमचे दिवस आता संपले आहेत . आता हिंदू समाजानेच हिंदुत्वाचा आड येणाऱ्यांची यादी करायला सुरुवात केली आहे आणि ती फार मोठी पण आता राहिलेली नाही आणि तुमच्यासारखे यादीतील लोकांना उध्वस्त करून टाकण्याचे , त्यांचे घरदार जाळणारे आमचे उद्योग नाही . आमच्या याद्या सर्वशक्तिमान परमेश्वर तयार करतो ज्याच्यावर तुमचा अजिबात विश्वास नाही आणि तोच ईश्वर सगळे घडवून पण आणतो. त्या यादीत समाविष्ट होऊ नका आणि नव्या याद्या बनवण्याच्या भानगडीत पण पडू नका हा तुम्हाला आमचा प्रेमपूर्वक सल्ला.

**रामकृष्ण हरी.**
**अहिल्यानगर.**
**तिथी : चैत्र कृ. एकादशी.**
**१४/४/२६.**
**भ्रमणध्वनी : ९४२२२२१५७०.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)